॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

# Shri Navnath Bhaktisar

## ADHYAYA 18 — ASHTADASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

***Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |***


### Summary

***Chapter 18** follows King **Gopichand**, now a wandering ascetic, as he arrives at **Poulpattan**—the kingdom of his brother-in-law, **Tilakchand**, and his sister, **Champavati**. Mocked by the court for his renunciation, **Gopichand** is forced to stay and eat in the horse stables. Overwhelmed by the humiliation and cruel taunts directed at her brother, **Champavati** commits suicide by stabbing herself.*

*Grief-stricken,* **Gopichand** *promises to revive her using the mystical powers of his guru,* **Jalindarnath**. *The skeptical* **Tilakchand** *demands* **Gopichand's** *left hand as collateral before letting him leave. Sensing the crisis through yogic vision,* **Jalindarnath** *rushes using a swift travel-mantra and meets* **Gopichand** *on the road. They return to court, where* **Jalindarnath** *reattaches* **Gopichand's** *hand and revives* **Champavati** *with sacred ash. A humbled* **Tilakchand** *begs for forgiveness, and* **Jalindarnath** *formally* **initiates Champavati** *into the* **Nath path** *before instructing* **Tilakchand** *to protect* **Gopichand's** *kingdom and young son,* **Muktichand**.

**Gopichand** *then retires to* **Badrikashram** *to perform intense penance (tapasya), standing balanced on an iron spike. After twelve years,* **Jalindarnath** *returns, and the Supreme Gods—including* **Vishnu**, **Shiva**, **Savita**, *and* **Varuna***—descend to bless the concluding udyapana ritual, formally establishing* **Gopichand** *as a perfected Siddha*


## Ovee 1

जयजयाजी करुणाकरा । पंढरीअधीशा । रुक्मिणीवरा भक्तपालका चकोरचंद्रा । प्रेमपीयूषधारका ॥

### Transliteration

**Jaya-jaya-ji karunaa-karaa | Pandharee-adheeshaa | Rukmineevaraa bhakta-paala-kaa chakora-chandraa | Prema-peeyoosha-dhaarakaa ||**

## Ovee 2

हे दीनबंधो दीननाथा । पुढें चालवी भक्तिसारकथा । मागिले अध्यायीं वैराग्यता । गोपिचंदा लाधलीं ॥

### Transliteration

Hey deena-bandho deenanaathaa | Pudhe chaalavee bhakti-saara-kathaa | Maagile adhyaayee vairaagyataa | Gopichandaa laadhalee ||

## Ovee 3

असो पुढें आतां श्रोतीं । अवधान द्यावें ग्रंथार्थी । गोपिचंद सोडूनि ग्रामाप्रती । वैराग्य आचरुं चालिला ॥

### Transliteration

Aso pudhe aataa shrotee | Avadhaana dyaave grantha-arthee | Gopichanda soduni graamaa-pratee | Vairaagya aacharu chaalilaa ||

## Ovee 4

मार्गी ग्रामोग्रामीं जात । आहारा पुरती भिक्षा मागत । पुढें मार्गीं गमन करीत । वाचे जप करीतसे ॥

### Transliteration

Maargee graamo-graamee jaatu | Aahaaraa puratee bhikshaa maagatu | Pudhe maargee gamana kareetu | Vaache japa kareetase ||

## Ovee 5

परी गौडबंगाल देश उत्तम । समाचार कळला ग्रामोग्राम । कीं गोपिचंद राजा नरोत्तम । योगींद्रनीति आचरला ॥

### Transliteration

Paree Gauda-Bangaala desha uttamu | Samaachaara kalalaa graamo-graamu | Kee Gopichanda raajaa narottamu | Yogeendra-neeti aacharalaa ||

## Ovee 6

गांवोगांवींचे सकळ जनीं । ऐकतां विव्हळ होती मनीं । नेत्रीं अश्रुपात गाळूनी । अहा अहा म्हणताती ॥

### Transliteration

Gaavo-gaaveenche sakala janee | Aikataa vivhala hotee manee | Netree ashrupaata gaaluunee | Ahaa ahaa mhanataatee ||

## Ovee 7

एकएकांसी बोलती वचन । राव नव्हे होती माया पूर्ण । कन्येसमान केलें पालन । सकळ प्रजेचें रायानें ॥

### Transliteration

Eka-ekaansee bolatee vachanu | Raava navhe hotee maayaa poornu | Kanye-samaana kele paalanu | Sakala prajeche raayaane ||

## Ovee 8

आतां ऐसा राजा मागुती । होणार नाहीं पुढतपुढती । ऐसें म्हणोनि आरंबळती । लोक गांवींचे सकळिक ॥

### Transliteration

**Aataa aisaa raajaa maagutee | Honaara naahee pudhata-pudhatee | Aise mhanoni aarambalatee | Loka gaaveenche sakaliku ||**

## Ovee 9

असो तो ज्या गांवीं जात । त्या गांवींचे लोक पुढें येत । म्हणती महाराजांनीं राहावें येथ । योग पूर्ण आचरावा ॥

### Transliteration

**Aso toh jyaa gaavee jaatu | Tyaa gaaveenche loka pudhe yetu | Mhanatee mahaaraajaannee raahaave yethu | Yoga poorna aacharaavaa ||**

## Ovee 10

नाना पदार्थ पुढें आणिती । परी तो न घे कदा नृपती । भिक्षा मागूनि आहारापुरती । पुढें मार्गीं जातसे ॥

### Transliteration

**Naanaa padaartha pudhe aanitee | Paree toh na ghe kadaa nripatee | Bhikshaa maguni aahaaraa-puratee | Pudhe maargee jaatase ||**

## Ovee 11

शेट सावकार मोठमोठे । बोळवीत येती तया वाटे । पुनः परता वागवट । बोलताती रायासी ॥

### Transliteration

**Sheta saavakaara motha-mothe | Bolaveeta yetee tayaa vaate | Punah parataa vaagavate | Bolataa-tee raayaasee ||**

## Ovee 12

हे महाराजा तुम्हांविण । प्रजा दिसत आहे दीन । जैसें शरीर प्राणाविण । निचेष्टित पडतसे ॥

### Transliteration

**Hey Mahaaraajaa tumhaa-vinu | Prajaa disata aahe deenu | Jaise shareera praanaa-vinu | Nicheshtita padatase ||**

## Ovee 13

तैसी गति प्रजेसी झाली । जरी तुम्ही जातां आमुची माउली । तरी योग साधूनि पुनः पाउलीं । दर्शन द्यावें आम्हातें ॥

### Transliteration

**Taisee gati prajesee jhaalee | Jaree tumhee jaataa aamuchee maaulee | Taree yoga saadhuni punah paaulee | Darshana dyaave aamhaate ||**

## Ovee 14

अवश्य म्हणूनि नृपनाथ । बोळवीतसे समस्त । ऐसें रायासी गांवोंगांवीं होत । अति गुंती चालावया ॥

### Transliteration

Avashya mhanuni nripanaathu | Bolaveetase samastu | Aise raayaasee gaavo-gaavee hotu | Ati guntee chaalaavayaa ||

## Ovee 15

असो ऐसें बहुत दिनीं । स्वराज्याची सीमा उल्लंघूनी । गौडबंगाल देश टाकूनि । कौलबंगालीं संचरला ॥

### Transliteration

Aso aise bahuta dinee | Sva-raajya-achee seemaa ullan-ghuunee | Gauda-Bangaala desha taakuni | Kaula-Bangaalee sancharalaa ||

## Ovee 16

त्याही कौलबंगालांत । गांवोगांवीं हा वृत्तांत । प्रविष्ट झाला लोकां समस्त । चकचकिताती अंतरी ॥

### Transliteration

Tyaahee Kaula-Bangaalaantu | Gaavo-gaavee haa vrittaantu | Pravishta jhaalaa lokaa samastu | Chaka-chakitaatee antaree ||

## Ovee 17

म्हणती गोपीचंद रायासमान । होणार नाहीं राजनंदन । अहा गोपीचंद प्रज्ञावान । धर्मदाता सर्वदा ॥

### Transliteration

Mhanatee Gopeechanda raayaa-samaanu | Honaara naahee raaja-nandanu | Ahaa Gopeechanda prajnyaa-vaanu | Dharma-daataa sarvadaa ||

## Ovee 18

असो कौलबंगालींचा नृपती । पौलपट्टण ग्रामीं वस्ती । तेथें भगिनी चंपावती । गोपीचंदाची नांदतसे ॥

### Transliteration

Aso Kaula-Bangaaleenchaa nripatee | Paula-pattana graamee vastee | Tethe bhaginee Champaavatee | Gopeechandaachee naandatase ||

## Ovee 19

तिलकचंद श्वशुर नामीं । महाप्रतापी युद्धधर्मीं । जैसा गोपीचंद संपत्तीं उत्तमीं । तैशाचि नीतीं तो असे ॥

### Transliteration

Tilaka-chanda shvashura naamee | Mahaa-prataapee yuddha-dharmee | Jaisaa Gopeechanda sampattee uttamee | Taishaachi neetee toh ase ||

## Ovee 20

गज वाजी अपरिमित । शिबिका नाना दिव्य रथ । धनभांडारें अपरिमित । राजसदनें भरलीं तीं ॥

### Transliteration

**Gaja vaajee aparimitu | Shibikaa naanaa divya rathu | Dhana-bhaandaare aparimitu | Raaja-sadane bharalee tee ||**

## Ovee 21

किल्ले कोट दुर्ग विशाळ । कौलबंगाल देश सबळ । तया देशींचा तो नृपाळ । तिलकचंद मिरविला ॥

### Transliteration

**Kille kota durga vishaalu | Kaula-Bangaala desha sabalu | Tayaa desheenchaa toh nripaalu | Tilakachanda miravilaa ||**

## Ovee 22

एक लक्ष सहस्त्रशत लक्ष । सबळ पृतनेचा असे दक्ष । परी ती पृतना नव्हे प्रत्यक्ष । काळ शत्रूचा मिरवतसे ॥

### Transliteration

**Eka laksha sahastra-shata lakshu | Sabala pritanechaa ase Dakshu | Paree tee pritanaa navhe pratyakshu | Kaala shatroochaa miravatase ||**

## Ovee 23

तया गृहीं ती चंपावती । सासुरवासिनी परम युवती । नणंदा जावा भावांप्रती । देवांपरी मानीतसे ॥

### Transliteration

**Tayaa grihee tee Champaavatee | Saasura=vaasinee parama yuvatee | Nanandaa jaavaa bhaavaam-pratee | Devaam- paree maaneetase ||**

## Ovee 24

परमप्रतापी गर्जत काळ । सासुसासरे असती सबळ । तेथेंही वृत्तांत समस्तां सकळ । गोपीचंदाचा समजला ॥

### Transliteration

**Parama-prataapee garjata kaalu | Saasu-saasare asatee sabalu | Tethenhee vrittaanta samastaa sakalu | Gopee-chandaachaa samajalaa ||**

## Ovee 25

समजला परी करिती टीका । म्हणती अहा रे नपुंसका । ऐसें राज्य सोडोनि लेकां । भीक मागणें वरियेलें ॥

### Transliteration

**Samajalaa paree karitee teekaa | Mhanatee ahaa re napunsakaa | Aise raajya sodoni lekaa | Bheeka maagane variyele ||**

## Ovee 26

अहा मृत्यू आला जरी । तरी भिक्षाझोळी न वंचावी करीं । क्षत्रिय धर्मदाय शरीरीं । भीक मागणें नसेचि ॥

### Transliteration

Ahaa mrityoo aalaa jaree | Taree bhikshaa-jholee na vanchaavee karee | Kshatriya dharmadaaya shareeree | Bheeka maagane nasechi ||

## Ovee 27

अहा जन्मांत येऊनि काय केलें । क्षात्रकुळा दूषण लाविलें । आमुचे मुखासी काळें लाविलें । पिशुन केलें जन्मांत ॥

### Transliteration

Ahaa janmaanta yeuni kaaya kele | Kshaatra-kulaa dooshana laavile | Amuche mukhaasee kaale laavile | Pishuna kele janmaantu ||

## Ovee 28

म्हणतील सोयरा तुमचा कैसा । नपुंसक झाला वेडापिसा । वैभव टाकूनि देशोदेशा । भीक मागे घरोघरीं ॥

### Transliteration

Mhanateela soyaraa tumachaa kaisaa | Napunsaka jhaalaa vedaapisaa | Vaibhava taakuni desho-deshaa | Bheeka maage gharo-gharee ||

## Ovee 29

तो जन्मतांचि कां नाहीं मेला । क्षत्रियकुळातें डाग लाविला । आतां स्वमुखा दाविणें कशाला । श्लाघ्य दिसेना आमुतें ॥

### Transliteration

Toh janma-taanchi kaa naahee melaa | Kshatriya-kulaate daaga laavilaa | Aataa sva-mukhaa daavine kashaalaa | Shlaaghya disenaa aamute ||

## Ovee 30

ऐसें आतां बहुतां रीती । लोक निंदितील आम्हांप्रती । अहा कैसी ती मैनावती । सुत दवडिला तिनें हा ॥

### Transliteration

Aise aataa bahutaa reetee | Loka ninditeela aamhaam-pratee | Ahaa kaisee tee Mainaavatee | Suta davadilaa tine haa ||

## Ovee 31

अहा पुत्रा देऊनि देशवटा । आपण बैसली राजपटा । जालिंदर हातीं धरुनि गोमटा । भ्रष्ट केलें राज्यासी ॥

### Transliteration

Ahaa putraa deuni deshavataa | Aapana baisalee raajapataa | Jaalindara haatee dharuni gomataa | Bhrashta kele raaj-yaasee ||

## Ovee 32

श्रेया सांडूनि रत्नवाटी । हातीं घेतली कैसी नरोटी । कनक टाकूनि चिंधुटी । भाळी बांधी प्रीतीनें ॥

### Transliteration

Shreyaa sanduni ratna-vaatee | Haatee ghetalee kaisee narotee | Kanaka taakuni chindhutee | Bhaalee baandhee preeteene ||

## Ovee 33

अहा जालिंदर कोणता निका । भिकार वाईट मिरवे लोकां । हातीं धरिला समूळ रोडका । डोई बोडका शिखानष्ट ॥

### Transliteration

Ahaa Jaalindara konataa nikaa | Bhikaara vaaeta mirave lokaa | Haatee dharilaa samoola rodakaa | Doee bodakaa shikhaa-nashtu ||

## Ovee 34

ऐसियाच्या लागूनि ध्यानीं । घरासि लाविला आपुल्या अग्नी । आतां काळें तोंड करुनी । जगामाजी मिरवतसे ॥

### Transliteration

Aisiyaa-chyaa laguni dhyaanee | Gharaasi laavilaa aapulyaa agnee | Aataa kaale tonda karunee | Jagaa-maajee miravatase ||

## Ovee 35

अहा माय नव्हे ती लांब म्हणावी । स्वसुत जिनें केला गोसावी । लट्टाश्रमाच्या लागूनि पायीं । विघ्न आणिलें राज्यांत ॥

### Transliteration

Ahaa Maaya navhe tee laamba mhanaavee | Svasuta jine kelaa gosaavee | Latta-shramaachyaa laguni paayee | Vighna aanile raajya-antu ||

## Ovee 36

आतां कोण तिचा बाप । उभा राहिला बलाढ्य भूप । राज्य हरुनि खटाटोप । देशोधडी लावील कीं ॥

### Transliteration

Aataa kona tichaa baapu | Ubhaa raahilaa balaadhya bhoopu | Raajya haruni khataatopu | Desho-dhadee laaveela kee ||

## Ovee 37

ऐसी वल्गना बहुत रीतीं । एकमेक स्वमुखें करिती । तें ऐकूनि चंपावती । क्षीण चित्तीं होतसे ॥

### Transliteration

Aisee valganaa bahuta reetee | Ekameka svamukhe karitee | Tey aikuni champaavatee | Ksheena chittee hotase ||

## Ovee 38

मनींच्या मनीं आठवूनि गुण । बंधूसाठीं करी रुदन । नणंदा जावा विशाळ बाण । हदयालागीं खोंचिती ॥

### Transliteration

Maneenchyaa manee aathavuni gunu | Bandhoo-saathee karee rudanu | Nanandaa jaavaa vishaala baanu | Hadayaa-laagee khonchitee ||

## Ovee 39

म्हणती भावानें उजेड केला । कीर्तिध्वज उभारिला । राज्य सांडूनि हात भिकेल । ओढवितो लोकांसीं ॥

### Transliteration

Mhanatee bhaavaane ujeda kelaa | Keerti-dhvaja ubhaarilaa | Raajya sanduni haata bhikelu | Odhavito lokaansee ||

## Ovee 40

मायबंधूंनी दिवटा लाविला । तिहीं लोकीं उजेड केला । आतां उजेड इचा उरला । हेही करील तैसेंचि ॥

### Transliteration

Maaya-bandhoonnee divataa laavilaa | Tihee lokee ujeda kelaa | Aataa ujeda ichaa uralaa | Hehee kareela taisenchi ||

## Ovee 41

अहा माय ती हो रांड । जगीं ओढविलें भांड । आतां जगीं काळें तोंड । करुनियां मिरवते ॥

### Transliteration

Ahaa Maaya tee ho raandu | Jagee odhavile bhaandu | Aataa jagee kaale tondu | Karuniyaa miravate ||

## Ovee 42

ऐसे दुःखाचे देती घाव । हदयीं खोंचूनि करिती ठाव । बोलणें होतसे शस्त्रगौरव । दुःख विषमारापरी ॥

### Transliteration

Aise duhkhaache detee ghaavu | Hradayee khonchuni karitee thaavu | Bolane hotase shastra-gauravu | Duhkha vishamaara-paree ||

## Ovee 43

येरीकडे गोपीचंद । पाहता पाहातां ग्रामवृंद । पौलपट्टणीं येऊन शुद्ध । पाणवठी बैसला ॥

### Transliteration

Yereekade Gopeechandu | Paahataa paahaataa graama-vrindu | Paula-pattanee yeuna shuddhu | Paanavathee baisalaa ||

## Ovee 44

हस्तें काढूनि शिंगीनाद । वाचे सांगत हरिगोविंद । परी स्वरुपामाजी प्रतापवृंद । झांकला तो जाईना ॥

### Transliteration

**Haste kaadhuni shingee-naadu | Vaache saangata Hari Govindu | Paree sva-rupaa-maajee prataapa-vrindu | Jhaankalaa toh jaaeenaa ||**

## Ovee 45

कीं अर्कावरी अभ्र आलें । परी तेज तयाचें नाहीं बुडालें । कीं मृगमदातें गुंडाळिलें । सुवास वेष्टिल्या राहीना ॥

### Transliteration

**Kee Arkaavaree abhra aale | Paree teja tayaache naahee budaale | Kee mrigamadaate gundaalile | Suvaasa veshtilyaa raaheenaa ||**

## Ovee 46

कीं अर्कावरी अभ्र तेवीं तो नृपनाथ । पाणवठ्यातें विराजत । तों परिचारिका अकस्मात । चंपावतीच्या पातल्या ॥

### Transliteration

**Kee Arkaavaree abhra tevee toh nripanaathu | Paanavathyaate viraajatu | Toh parichaarikaa akasmaatu | Champaa-vateechyaa paatalyaa ||**

## Ovee 47

त्यांनीं येतांचि देखिला नयनीं । देखतांचि राव ओळखिला चिन्हीं । मग त्या तैशाचि परतोनी । राजसदना पैं गेल्या ॥

### Transliteration

**Tyaannee yetaanchi dekhilaa nayanee | Dekhataanchi raava olakhilaa chinhee | Maga tyaa taishaachi paratonee | Raaja-sadanaa pai gelyaa ||**

## Ovee 48

सहराया सकळांसी । वृत्तांत सांगती त्या युवतींसी । कीं गोपीचंद पाणवठ्यासी । येवोनियां बैसला ॥

### Transliteration

**Saha-raayaa sakalaansee | Vrittaanta saangatee tyaa yuvateensee | Kee Gopeechanda paanavathyaasee | Yevoniyaa baisalaa ||**

## Ovee 49

ऐसा वृत्तांत रायें ऐकून । मग चित्तीं झाला क्षीण । म्हणे मुखासी काळें लावून । आमुचे गांवीं कां आला ॥

### Transliteration

**Aisaa vrittaanta raaye aikunu | Maga chittee jhaalaa ksheenu | Mhane mukhaasee kaale lavunu | Aamuche gaavee kaa aalaa ||**

## Ovee 50

आला परी लोकांत । करील आमुची अपकीर्त । संचरोनि पट्टणांत । भीक मागेल गृहोगृहीं ॥

### Transliteration

**Aalaa paree lokaantu | Kareela aamuchee apakeertu | Sancharoni patta-naantu | Bheeka maagela griho-grihee ||**

## Ovee 51

लोक म्हणतील अमक्याच्या अमुक । घरोघरीं मागतो भीक । काळें करुनि आमुचें मुख । जाईल मग पुढारां ॥

### Transliteration

**Loka mhanateela amakyaachyaa amuku | Gharo-gharee maagato bheeku | Kaale karuni aamuche mukhu | Jaaeela maga pudhaaraa ||**

## Ovee 52

अहा राया ऐसें करणें होतें । तरी कासया आलासी येथें । स्वदेशीं चोरोनियां गुप्त । भीक मागावी सुखानें ॥

### Transliteration

**Ahaa raayaa aise karane hote | Taree kaasayaa aalaasee yethe | Svadeshee choroniyaa guptu | Bheeka maagaavee sukhaane ||**

## Ovee 53

सकळ राजसदनींचीं माणसें । वेडाळपणीं बोलती त्यास । तिलकचंद येऊनि त्या समयास । गृहमनुष्यां सांगतसे ॥

### Transliteration

**Sakala raaja-sadaneenchee maanase | Vedaalapanee bolatee tyaasu | Tilakachanda yeuni tyaa samayaasu | Griha-manushyaa saangatase ||**

## Ovee 54

म्हणे आतां गोपीचंद । भीक मागेल गांवांत प्रसिद्ध । परी जगांत आपुलें नांव शुद्ध । अपकीर्ति मिरवेल ॥

### Transliteration

**Mhane aataa Gopeechandu | Bheeka maagela gaavaanta prasiddhu | Paree jagaata aapule naava shuddhu | Apakeerti miravelu ||**

## Ovee 55

तरी आतां पाचारुन । अश्वशाळेंत ठेवा आणून । तेथें तयातें घालूनि भोजन । बोळवावें येथून ॥

### Transliteration

**Taree aataa paachaarunu | Ashva-shaalenta thevaa anunu | Tethe tayaate ghaaluni bhojanu | Bolavaave yethunu ||**

## Ovee 56

ऐसें सांगूनि नृपें सर्वालां । राव सभास्थानीं गेला । येरीकडे परिचारिकांला । पाठविलें बोलावूं ॥

### Transliteration

**Aise sanguni nripe sarvaalaa | Raava sabhaa-sthaanee gelaa | Yereekade parichaarikaalaa | Paathavile bolaavoo ||**

## Ovee 57

परिचारिका जाऊनि तेथें । म्हणती महाराजा नृपनाथें । बोलाविले आहे तुम्हांतें । चंपावतीचे भेटीसी ॥

### Transliteration

**Parichaarikaa jauni tethe | Mhanatee Mahaaraajaa nripanaathe | Bolaavile aahe tumhaante | Champaa-vateeche bheteesee ||**

## Ovee 58

राव म्हणे आम्ही गोसावी । आम्हां कैंची भगिनी ताई माई । घरघर बाप घरघर आई । भरला असे विश्वातें ॥

### Transliteration

**Raava mhane aamhee gosaavee | Aamhaa kainchee bhaginee taaee maaee | Ghara-ghara baapa ghara-ghara aaee | Bharalaa ase vishvaate ||**

## Ovee 59

परी आतां असो चंपावती । बोलावीतसे आम्हाप्रती । तरी भेटोनि तिये युवती । पुढें मार्ग क्रमावा ॥

### Transliteration

**Paree aataa aso Champaavatee | Bolaaveetase aamhaa-pratee | Taree bhetoni tiye yuvatee | Pudhe maarga kramaavaa ||**

## Ovee 60

ऐसें म्हणोनि परिचारिकांसहित । चालता झाला नृपनाथ । परिचारिका पश्चिम द्वारांत । त्यासी घेवोनि जाताती ॥

### Transliteration

**Aise mhanoni parichaarikaan-sahitu | Chaalataa jhaalaa nripanaathu | Parichaarikaa pashchima dvaara-antu | Tyaasee ghevoni jaataatee ||**

## Ovee 61

अश्वशाळेमाजी नेवोन । बैसविला राजनंदन । परिचारिका म्हणती येथें । धाडून देऊं चंपावतीतें ॥

### Transliteration

**Ashvashaalemaajee nevonu | Baisavilaa raaja-nandanu | Parichaarikaa mhanatee yethe | Dhaaduna deoo champaavateete ||**

## Ovee 62

तुम्ही बैसलां तैसेंचि बैसावें । भेटीसी येतील येथें सर्व । ऐसा परिचारिका दावूनि भाव । सदनामाजी संचरल्या ॥

### Transliteration

**Tumhee baisalaa taisenchi baisaave | Bheteesee yeteela yethe sarvu | Aisaa parichaarikaa daavuni bhaavu | Sadanaa-maajee sancharalyaa ||**

## Ovee 63

सकळांसी सांगितला वृत्तांत । कीं राव बैसविला अश्वशाळेंत । मग राजकांतेनें त्वरित । अन्नपात्र भरियले ॥

### Transliteration

**Sakalaansee saangitalaa vrittaantu | Kee raava baisavilaa ashva-shaalentu | Maga raaja-kaantene tvaritu | Anna-paatra bhariyale ||**

## Ovee 64

तरुणपणाजोगें पात्र भरोन । परिचारिकेकरीं शीघ्र ओपून । धाडिती झाली नितंबिन । अश्वशाळेंत तत्त्वतां ॥

### Transliteration

**Tarunapanaajoge paatra bharonu | Parichaarikekaree sheeghra opunu | Dhaaditee jhaalee nitambinu | Ashvashaalenta tattvataa ||**

## Ovee 65

तंव ती परिचारिका घेवोनि अन्न । अश्वशाळेत आली लगबग करोन । म्हणे महाराजा भोजना अन्न । पाठविलें तुम्हासी ॥

### Transliteration

**Tava tee parichaarikaa ghevoni annu | Ashva-shaaleta aalee lagabaga karonu | Mhane Mahaaraajaa bhojanaa annu | Paathavile tumhaasee ||**

## Ovee 66

तें पात्र पुढें ठेवोन । मग परिचारिका म्हणे करा भोजन । भोजन झालिया भेटीकारण । चंपावती येईल कीं ॥

### Transliteration

**Tey paatra pudhe thevonu | Maga parichaarikaa mhane karaa bhojanu | Bhojana jhaaliyaa bhetee-kaaranu | Champaavatee yaeela kee ||**

## Ovee 67

राव विचार करी मानसीं । अहा आदर आहे संपतीसी । व्याही विहिणी खाथासी । संपत्तीसी मिळताती ॥

### Transliteration

**Raava vichaara karee maanasee | Ahaa aadara aahe sampateesee | Vyaahee vihinee khayaasee | Sampatteesee milataatee ||**

## Ovee 68

तरी आतां असो कैसें । आपण घेतला आहे संन्यास । शत्रुमित्र सुखदु:खास । समानापरी लेखावे ॥

### Transliteration

**Taree aataa aso kaise | Aapana ghetalaa aahe sannyaasu | Shatru-Mitra duh-kha-sukha-duhkhaasu | Samaanaa-paree lekhaave ||**

## Ovee 69

तरी मानापमान उभे राहटें । हे प्रपंचाची मिरवे कोटी । तरी ऐसियासी आधीं कष्टी । आपण कशास व्हावें हो ॥

### Transliteration

**Taree maana-apamaana ubhe raahate | Hey prapanchaachee mirave kotee | Taree aisiyaasee aadhee kashtee | Aapana kashaasa vhaave ho ||**

## Ovee 70

मान अपमान दोन्ही समान । पाळिताती योगीजन । ऐसेपरी लक्षूनि मन । भोजनातें बैसला ॥

### Transliteration

**Maana apamaana donhee samaanu | Paalitaatee yogee-janu | Aiseparee lakshuni manu | Bhojanaate baisalaa ||**

## Ovee 71

मनांत म्हणे चैतन्यब्रह्म । तयाचें जीवन हें अन्नब्रह्म । स्वरुपब्रह्मींचें जीवनब्रह्म । नामब्रह्म मिरवीतसे ॥

### Transliteration

**Manaanta mhane chaitanya-brahmu | Tayaache jeevana hey anna-brahmu | Sva-rupa-brahmeenche jeevana-brahmu | Naama-Brahma miraveetase ||**

## Ovee 72

तरी अन्नब्रह्म धिक्कारुन । मग कैंचे पाहावें सुखसंपन्न । ऐसा विचार करुन । भोजनातें बैसला ॥

### Transliteration

**Taree anna-brahma dhikkaarunu | Maga kainche paahaave sukha-sampannu | Aisaa vichaara karunu | Bhojanaate baisalaa ||**

## Ovee 73

येरीकडे अंतःपुरांत । स्त्रिया निघोनि गवाक्षद्वारांत । पाहती नृपनाथ नेत्रीं । दीक्षा पाहती ॥

### Transliteration

**Yeree-kade antah-puraantu | Striyaa nighoni gavaaksha-dvaaraantu | Paahatee nripanaathu | Netree deekshaa paahatee ||**

## Ovee 74

मग ऐकेकी बोलती वचन । अहा हें काय निर्लज्जपण । सोयरियावरीं अश्वशाळेंत बैसोन । भोजन करितो करंटा ॥

### Transliteration

**Maga aikekee bolatee vachanu | Ahaa hey kaaya nirlajjapanu | Soyariyaavaree ashva-shaalenta baisonu | Bhojana karito karantaa ||**

## Ovee 75

एक म्हणती चंपावतीसी । वेगें आणावी या ठायासी । ऐकोनि नणंदेनें त्वरेंसीं । धांव घेतली तिजपासीं ॥

### Transliteration

**Eka mhanatee Champaavateesee | Vege aanaavee yaa thaayaasee | Aikoni nanandene tvarensee | Dhaava ghetalee tijapaasee ||**

## Ovee 76

हस्तीं धरुनि चंपावतीसी । वेगें मेळीं आणिले निगुतीसी । मग हस्त उचलोनि तियेसी । रयातें दाविल्या जाहल्या ॥

### Transliteration

**Hastee dharuni Champaavateesee | Vege melee aanile niguteesee | Maga hasta uchaloni tiyesee | Rayaate daavityaa jaahalyaa ||**

## Ovee 77

तीस घेवोनि शेजारासी । पाहती गवाक्षद्वारासी । परी बोल बोलती कुअक्षरासी । कुश्चळवाणी करोनियां ॥

### Transliteration

**Teesa ghevoni shejaa-raasee | Paahatee gavaaksha-dvaaraasee | Paree bola bolatee kuaksharaasee | Kushchala-vaanee karoniyaa ||**

## Ovee 78

म्हणती सर्वस्वीं भ्रष्ट झाला । मान अपमान कैंचा त्याला । तस्करासम येवोनि बैसला । अश्वशाळेमाझारी ॥

### Transliteration

**Mhanatee sarvasvee bhrashta jhaalaa | Maana apamaana kainchaa tyaalaa | Taskaraasama yevoni baisalaa | Ashva-shaale-maajhaaree ||**

## Ovee 79

अहा जळो जळो यांचे जिणें । केवढें वैभव सोडून । आतां हिंडतो दैन्यवाणा । श्वानासमान घरोघरीं ॥

### Transliteration

**Ahaa jalo jalo yaanche jine | Kevadhe vaibhava sodunu | Aataa hindato dainyavaanaa | Shvaanaa-samaana gharo-gharee ||**

## Ovee 80

म्हणवीत होता प्रजानाथ । काय मिळालें अधिक यांत । भणंगासमान दिसे आम्हांत । जैसा तस्कर धरियेला ॥

### Transliteration

Mhanaveeta hotaa prajaa-Naathu | Kaaya milaale adhika yaantu | Bhanangaa-samaana dise aamhaantu | Jaisaa taskara dhariyelaa ||

## Ovee 81

परी जैसें तैसें असो कैसें । कासया आला सोयरेगृहास । येवोनि बैसला अश्वशाळेस । भोजन करितो निर्लज्ज ॥

### Transliteration

Paree jaise taise aso kaise | Kaasayaa aalaa soyare-grihaasu | Yevoni baisalaa ashvashaalesu | Bhojana karito nirlajju ||

## Ovee 82

ऐसें नानापरी युवती । कीटकशब्दें वाखाणिती । तें ऐकोनि चंपावती । परम दुःखी झालीसे ॥

### Transliteration

Aise naanaa-paree yuvatee | Keetaka-shabde vaakhaa-nitee | Tey aikoni Champaavatee | Parama duhkhee jhaaleese ||

## Ovee 83

प्रथमचि चंपावती गोरटी । बंधूतें पाहतां निजदृष्टीं । परम झाली होती कष्टी । दुःख तयाचें पाहोनी ॥

### Transliteration

Prathamachi Champaavatee goratee | Bandhoote paahataa nija-drishtee | Parama jhaalee hotee kashtee | Duhkha tayaache paahonee ||

## Ovee 84

त्यावरी नणंदा जावा पिशुन । दुःखलेशीं बोलती वचन । परी शब्द नसती ते बाण । हृदयामाजी खडतरती ॥

### Transliteration

Tyaa-varee nanandaa jaavaa pishunu | Duhkha-leshee bolatee vachanu | Paree shabda nasatee tey baanu | Hradayaa-maajee khadatara-tee ||

## Ovee 85

तेणेंकरुनि विव्हळ झाली । पश्चात्तापें परम तापली । मग स्त्रीमंडळ सोडूनि वहिली । सदना आली आपुल्या ॥

### Transliteration

Tenekaruni vivhala jhaalee | Pashchaa-ttaape parama taapalee | Maga streemandala soduni vahilee | Sadanaa aalee aapulyaa ||

## Ovee 86

येतां झाली जीवित्वा उदार । वेगें शस्त्र घेतलें खंजीर । करीं कवळूनि क्षणें उदर । फोडिती झाली बळानें ॥

### Transliteration

**Yetaa jhaalee jeevitvaa udaaru | Veege shastra ghetale khanjeeru | Karee kavaluni kshane udaru | Phoditee jhaalee balaane ||**

## Ovee 87

खंजीर होतां उदरव्यक्त । जठर फोडोनि बाहेर येत । क्षणेंचि झाली प्राणरहित । सदनीं रक्त मिरविलें ॥

### Transliteration

**Khanjeera hotaa udara-vyaktu | Jathara phodoni baahera yetu | Kshanenchi jhaalee praana-rahitu | Sadanee rakta miravile ||**

## Ovee 88

येरीकडे अश्वशाळेंत । परिचारिकेसी म्हणे नृपनाथ । भेटवीं मातें चंपावतीस । चल जाऊं दे आम्हासी ॥

### Transliteration

**Yereekade ashva-shaalentu | Parichaarikesee mhane nripanaathu | Bhetavee maate Champaavateesu | Chala jaaoo dey aamhaasee ||**

## Ovee 89

येरी म्हणती त्या शुभाननी । चंपावती सासुरवासिनी । त्यावरी अश्वशाळेलागुनी । कैसी येथें येईल ॥

### Transliteration

**Yeree mhanatee tyaa shubha-aananee | Champaavatee saasura-vaasinee | Tyaa-varee ashva-shaale-laagunee | Kaisee yethe yeeelu ||**

## Ovee 90

परी आतां असो कैसे । तुम्ही वस्तीस असा या रात्रीस । आम्ही सांगूनि चंपावतीस । गुप्तवेषें आणूं कीं ॥

### Transliteration

**Paree aataa aso kaise | Tumhee vasteesa asaa yaa raatreesu | Aamhee sanguni Champaavateesu | Gupta-veshe aanoo kee ||**

## Ovee 91

ऐसें ऐकोनि राये वचन । म्हणे राहीन आजिचा दिन । तरी आतांचि जाऊन । श्रुत करावें तियेसी ॥

### Transliteration

**Aise aikoni raaye vachanu | Mhane raaheena aajichaa dinu | Taree aataanchi jaunu | Shruta karaave tiyesee ||**

## Ovee 92

अवश्य म्हणुनि शुभाननी । आताचि सांगूं तियेलागुनी । रात्रीमाजी येऊं घेऊनी । भेटीलागीं महाराजा ॥

### Transliteration

Avashya mhanuni shubha-aananee | Aataachi saangoo tiye-laagunee | Raatree-maajee yeoo gheuune | Bhetee-laagee Mahaaraajaa ||

## Ovee 93

ऐसें बोलोनि त्या युवती । पाहत्या झाल्या चंपावती । तंव खंजीर खोवोनि पोटीं । महीवरी पडलीसे ॥

### Transliteration

Aise boloni tyaa yuvatee | Paahatyaa jhaalyaa Champaavatee | Tava khanjeera khovoni potee | Maheevaree padaleese ||

## Ovee 94

तें पाहुनि शब्दकोल्हाळी । धावती झाली स्त्रीमंडळी । प्राणगत पाहतां बाळी । एकचि कल्होळ माजविला ॥

### Transliteration

Tey paahuni shabda-kolhaalee | Dhaavatee jhaalee stree-mandalee | Praanagata paahataa baalee | Ekachi kalhoola maajavilaa ||

## Ovee 95

रुधिराचें तळें सांचलें । जठर अवघें बाहेर पडलें । तें पाहोनि युवती वहिलें । शंखध्वनि करिताती ॥

### Transliteration

Rudhiraache tale saanchale | Jathara avaghe baahera padale | Tey paahoni yuvatee vahile | Shankha-dhvani karitaa-tee ||

## Ovee 96

सासु सासरे भावे दीर । पति नणंदा दाटल्या जावा चाकर । म्हणती बंधूकरितां साचार । उदार झाली चंपावती ॥

### Transliteration

Saasu saasare bhaave deeru | Pati nanandaa daatalyaa jaavaa chaakaru | Mhanatee bandhoo-karitaa saachaaru | Udaara jhaalee Champaavatee ||

## Ovee 97

मग बोलूं नये तेंचि बोलती । म्हणती अधम मंदमती । कोणीकडूनि या क्षितीं । दुष्ट नष्ट भ्रष्ट आला ॥

### Transliteration

Maga boloo naye tenchi bolatee | Mhanatee adhama manda-matee | Konee-kaduni yaa kshitee | Dushta nashta bhrashta aalaa ||

## Ovee 98

आपुल्या सदनीं अग्नि लाविला । शेवटीं लावावया येथें आला । तरी त्यातें बाहेर घाला । मुख पाहों नका हो ॥

### Transliteration

**Aapulyaa sadanee agni laavilaa | Shevatee laavaavayaa yethe aalaa | Taree tyaate baahera ghaalaa | Mukha paaho nakaa ho ||**

## Ovee 99

एक म्हणती तयाकरितां । चंपावतीनें केली कर्तव्यता । तरी तिच्यासमान त्याची अवस्था । करोनि बोळवा तिजसंगें ॥

### Transliteration

**Eka mhanatee tayaa-karitaa | Champaa-vateene kelee kartavyataa | Taree tichyaa-samaana tyaachee avasthaa | Karoni bolavaa tijasange ||**

## Ovee 100

ऐसे नाना तर्ककुतर्क । करोनि मारिती हंबरडा हांक । एकचि कोल्हाळ करिती सकळिक । अहा अहा म्हणोनी ॥

### Transliteration

**Aise naanaa tarka-kutarku | Karoni maaritee hambaradaa haanku | Ikachi kolhaala karitee sakaliku | Ahaa ahaa mhanonee ||**

## Ovee 101

कोणी हंबरडा हाणिती बळें । कोणी पिटिती वक्षःस्थळें । कोणी महीं आपटिती भाळें । मूर्च्छागत पडताती ॥

### Transliteration

**Konee hambaradaa haanitee bale | Konee pititee vakshah-sthale | Konee mahee aapatitee bhaale | Moorchchaagata padataa-tee ||**

## Ovee 102

कोणी आठवूनि रडती गुण । कोणी रडताती चांगुलपण । कोणी म्हणती दैवहीन । भ्रतार असे इयेचा ॥

### Transliteration

**Konee aathavuni radatee gunu | Koonee radataatee chaangula-panu | Konee mhanatee daiva-heenu | Bhrataara ase iyechaa ||**

## Ovee 103

कोणी म्हणती अब्रूवान । चंपावती होती उत्तम । निजबंधूचे क्लेश पाहोन । दिधला प्राण लज्जेनें ॥

### Transliteration

**Konee mhanatee abroo-vaanu | Champaavatee hotee uttamu | Nija-bandhooche klesha paahonu | Didhalaa praana lajjene ||**

## Ovee 104

एक म्हणे चंपावती । किती वर्णावी गुणसंपत्ती । मृगनयनी जैसा हस्ती । स्त्रियांमाजी मिरवतसे ॥

### Transliteration

**Eka mhane Champaavatee | Kitee varnaavee gun-asampattee | Mriga-nayanee jaisaa hastee | Striyaam-maajee miravatase ||**

## Ovee 105

एक म्हणती सदा आनंदी असून । पहात होतें हास्यवदन । सदा हर्षित असे गमन । हस्ती जेवीं पृतनेचा ॥

### Transliteration

**Eka mhanatee sadaa aanandee asunu | Pahaata hote haasya-vadanu | Sadaa harshita ase gamanu | Hastee jevee pritanechaa ||**

## Ovee 106

एक म्हणे चांगुलपर्णी । घरांत मिरवें जेवीं तरणी । एक म्हणे वो शुभाननी । किती मृदु कोकिळा ॥

### Transliteration

**Eka mhane chaangula-parnee | Gharaanta mirave jevee taranee | Eka mhane vo shubha-aananee | Kitee mridu kokilaa ||**

## Ovee 107

एक म्हणती सासुरवास । असतां नाहीं झाली उदास । ईश्वरतुल्य मानूनि पुरुषास । शुश्रुषा करी वडिलांची ॥

### Transliteration

**Eka mhanatee saasuravaasu | Asataa naahee jhaalee udaasu | Eeshvaratulya maanuni purushaasu | Shushrushaa karee vadilaanchee ||**

## Ovee 108

ऐसें म्हणोनि आक्रंदती । अवघे एकचि कोल्हाळ करिती । तो नाद अश्वशालेप्रती । अकस्मात आदळला ॥

### Transliteration

**Aise mhanoni aakrandatee | Avaghe ekachi kolhaala karitee | Toh naada ashvashaale-pratee | Akasmaata aadalalaa ||**

## Ovee 109

अश्वशाळे गौडनाथ । अश्वरक्षकालागीं पुसत । एवढा कोल्हाळ कां सदनांत । झाला आहे कळेना ॥

### Transliteration

**Ashvashaale Gaudanaathu | Ashva-raksha-kaalaagee pusatu | Evadhaa kolhaala kaa sadanaantu | Jhaalaa aahe kalenaa ||**

## Ovee 110

परी तो सर्वांठायी बोभाट । झाला आहे गांवांत प्रविष्ट । कीं भावाकरितां अति कष्ट । जीवित्वातें दवडिलें ॥

### Transliteration

Paree toh sarvaan-thaayee bobhaatu | Jhaalaa aahe gaavaanta pravishtu | Kee bhaavaa-karitaa ati kashtu | Jeevit-vaate davadile ||

## Ovee 111

तें अश्वरक्षकांसी होतां श्रवण । पुसतां सांगती वर्तमान । म्हणती नाथा जीव राणीनें । बंधूकारणें दीधला ॥

**Transliteration**

Tey ashva-rakshakaansee hotaa shravanu | Pusataa saangatee vartamaanu | Mhanatee Naathaa jeeva raaneene | Bandhoo-kaarane deedhalaa ||

## Ovee 112

नृप म्हणे रे कवण राणी । कोण बंधू कवणस्थानीं । येरु म्हणती ऐकिलें कानी । चंपावती राणी ती ॥

**Transliteration**

Nripa mhane re kavana raanee | Kona bandhoo kavana-sthaanee | Yeru mhanatee aikile kaanee | Champaavatee raanee tee ||

## Ovee 113

तियेचा बंधु झाला पिसा । सोडूनि गेला राजमांदुसा । म्हणोनि वरोनि दुःखलेशा । जीवित्व त्यागिलें रांडकीने ॥

**Transliteration**

Tiyechaa bandhu jhaalaa pisaa | Soduni gelaa raaja-maandusaa | Mhanoni varoni duhkhaleshaa | Jeevitva tyaagile raandakeene ||

## Ovee 114

येरु म्हणे बंधु कोण । ते म्हणती त्रिलोकचंदनंदन । गोपीचंद ऐसें नाम । जगामाजी मिरवतसे ॥

**Transliteration**

Yeru mhane bandhu konu | Tey mhanatee trilochana-nandanu | Gopeechanda aise naamu | Jagaa-maajee miravatase ||

## Ovee 115

ऐसें ऐकोनि नृपनाथ । नयनीं लोटले अश्रुपात । चित्तीं म्हणे वो बाई घात । मजसाठीं कां केला ॥

**Transliteration**

Aise aikoni nripanaathu | Nayanee lotale ashru-paatu | Chittee mhane vo baaee ghaatu | Maja-saathee kaa kelaa ||

## Ovee 116

मग चंपावतीचे आठवूनि गुण । गोपीचंद मोहें करी रुदन । अहा मजसाठीं दिधला प्राण । हें अनुचित झालें हो ॥

**Transliteration**

Maga Champaa-vateeche aathavuni gunu | Gopeechanda mohe karee rudanu | Ahaa maja-saathee didhalaa praanu | Hey anucheeta jhaale ho ||

## Ovee 117

तरी आतां महीवरती । माझी झाली अपकीर्ती । आणिक सोयरे दु:ख चित्तीं । मानितील बहुवस ॥

### Transliteration

Taree aataa mahee-varatee | Maajhee jhaalee apakeertee | Aanika soyare duhkha chittee | Maaniteela bahuvasu ||

## Ovee 118

मी येथें आलों म्हणोन । चंपावतीनें दिधला प्राण । हें दु:खा होईल कारण । विसर पडणार नाहीं कीं ॥

### Transliteration

Mee yethe aalo mhanonu | Champaa-vateene didhalaa praanu | Hey duhkhaa hoeela kaaranu | Visara padanaara naahee kee ||

## Ovee 119

ऐसा विचार करी चित्तांत । परी नयनीं लोटले अश्रुपात । येरीकडे संस्कारासी प्रेत । चितामही चालिलें ॥

### Transliteration

Aisaa vichaara karee chittaantu | Paree nayanee lotale ashru-paatu | Yereekade sanskaaraasee pretu | Chitaa-mahee chaalile ||

## Ovee 120

गोपीचंदही प्रेत पाहून । करीत चालिला सवें रुदन । परी चित्त वेधलें कल्पनेकरुन । अपकीर्ति अवघी जाहली ॥

### Transliteration

Gopee-chandahee preta pahunu | Kareeta chaalilaa save rudanu | Paree chitta vedhale kalpane-karunu | Apakeerti avaghee jaahalee ||

## Ovee 121

तरी आतां असो कैसें । उठवावें स्वभगिनीसी । आणि चमत्कार सोयऱ्यांसी । दाखवावा प्रतापें ॥

### Transliteration

Taree aataa aso kaise | Uthavaave sva-bhagineesee | Aani chamat-kaara soyar yaansee | Daakha-vaavaa prataape ||

## Ovee 122

आम्हीं जोग घेतला म्हणूनी । तृणासमान मानिलें यांनीं । तरी नाथपंथाची प्रतापकरणी । निजदृष्टीं दावावी ॥

### Transliteration

Aamhee joga ghetalaa mhanuunee | Trinaa-samaana maanile yaannee | Taree Naatha-panthaachee prataapa-karanee | Nija-drishtee daavaavee ||

## Ovee 123

जैसा पार्वतीचा गोसावी । परी दक्षें हेळितां तो जांवई । जीवित्व हरुनि प्रताप महीं । गाजविला तयानें ॥

### Transliteration

Jaisaa Paarvateechaa gosaavee | Paree Dakshe helitaa toh jaavaee | Jeevitva haruni prataapa mahee | Gaajavilaa tayaane ||

## Ovee 124

कीं अष्टवक्र अष्टाबाळ ब्राह्मण । कुरुप म्हणूनि केलें हेळण । परी त्यानें प्रताप दाखवून । विप्र मुक्त केले पैं ॥

### Transliteration

Kee Ashtavakra ashtaabaala braahmanu | Kurupa mhanuni kele helanu | Paree tyaane prataapa daakhavunu | Vipra mukta kele pai ||

## Ovee 125

कीं वामनरुप असतां सान । बळीनें मानिलें तृणासमान । परी आपुला प्रताप दाखवून । पातालभुवनीं मिरविला ॥

### Transliteration

Kee Vaamana-rupa asataa saanu | Baleene maanile trinaa-samaanu | Paree aapulaa prataapa daakhavunu | Paataala-bhuvanee miravilaa ||

## Ovee 126

कीं अगस्तीचा देह लहान । अर्णवें मानिला तृण । परी केशव म्हणतां नारायण । आचमनातें उरला नसे ॥

### Transliteration

Kee Agasteechaa deha lahaanu | Arnave maanilaa trinu | Paree Keshava mhanataa Naaraayanu | Aacha-manaate uralaa nase ||

## Ovee 127

कीं उदयतरुपोटीं । लहान एकादशी गोरटी । परी मृदुमान्या न सान दृष्टी । पाहतां मृत्य वरियेला ॥

### Transliteration

Kee udaya-taru-potee | Lahaana ekaadashee goratee | Paree mridu-maanyaa na saana drishtee | Paahataa mritya variyelaa ||

## Ovee 128

तो दशग्रीव राक्षसपाळ । तृणतुल्य मानिला अनिलबाळ । परी सकळ लंकेचा झाला काळ । एकदांचि जाळिली ॥

### Transliteration

**Toh Dasha-greeva raakshasa-paalu | Trina-tulya maanilaa Anila-baalu | Paree sakala lankechaa jhaalaa kaalu | Ekadaanchi jaalilee ||**

## Ovee 129

तन्यायें आम्हां येथ । झालें मानसन्मानरहित । तरी आतां यांतें नाथपंथ । निजदृष्टीं दाखवावा ॥

### Transliteration

**Tannyaaye aamhaa yethu | Jhaale maana-sanmaana-rahitu | Taree aataa yaante Naatha-panthu | Nija-drishtee daakhavaavaa ||**

## Ovee 130

मग सहजस्थितीसवें । स्मशानवटीं गेला राय । प्रेतानिकट उभा राहे । उभा राहूनि बोलतसे ॥

### Transliteration

**Maga sahaja-sthiteesave | Smashaa-navatee gelaa raayu | Pretaa-nikata ubhaa raahe | Ubhaa rahuni bolatase ||**

## Ovee 131

म्हणे ऐका माझें वचन । प्रेत करुं नका भस्म । श्रीगुरु जालिंदर येथें आणून । चंपावती उठवीन की ॥

### Transliteration

**Mhane aikaa maajhe vachanu | Preta karu nakaa bhasmu | Shreeguru Jaalindara yethe anunu | Champaavatee uthaveena kee ||**

## Ovee 132

अहा मी येथें समयीं असतां । वायां जातसे भगिनी आतां । मग व्यर्थ आचरुनि नाथपंथा । सार्थक नाहीं मिरविलें ॥

### Transliteration

**Ahaa mee yethe samayee asataa | Vaayaa jaatase bhaginee aataa | Maga vyartha aacharuni Naatha-panthaa | Saarthaka naahee miravile ||**

## Ovee 133

कीं पाहा मातुळकुळ । आस्तिकें रक्षिलें तपोबळें । तेवीं येथें युवती निर्मळ । चंपावती उठवीन मी ॥

### Transliteration

**Kee paahaa maatulakulu | Aastike rakshile tapo-balee | Tevee yethe yuvatee nirmalu | Champaavatee uthaveena mee ||**

## Ovee 134

कीं अहिरणी गुंतता हिरा । हिरकणी काढी तया सत्वरा । तेवीं येथें भगिनी सुंदरा । चंपावती उठवीन मी ॥

### Transliteration

**Kee ahiranee guntataa hiraa | Hirakanee kaadhee tayaa satvaraa | Tevee yethe bhaginee sundaraa | Champaavatee uthaveena mee ||**

## Ovee 135

कीं मोहरासवें सुत सगुण । कदापि नव्हे भस्म । तेवीं येथें सुमधुम । चंपावती उठवीन मी ॥

### Transliteration

**Kee moha-raasave suta sagunu | Kadaapi navhe bhasmu | Tevee yethe sumadhumu | Champaavatee uthaveena mee ||**

## Ovee 136

ऐसें बोले सकळांकारणें । परी अविश्वासी सकळ जन । म्हणती मेलिया जीवित्व पूर्ण । कदा काळी येईना ॥

### Transliteration

**Aise bole sakalaan-kaarane | Paree avishvaasee sakala janu | Mhanatee meliyaa jeevitva poornu | Kadaa kaalee yaeenaa ||**

## Ovee 137

कीं बाळल्या रुखालागी पाला । आला ऐसा नाहीं ऐकिला । हें तों न घडे कदा बोला । धर्मनिष्ठ हा बोलतसे ॥

### Transliteration

**Kee baalalyaa rukhaa-laagee paalaa | Aalaa aisaa naahee aikilaa | Hey toh na ghade kadaa bolaa | Dharmanishtha haa bolatase ||**

## Ovee 138

गोपीचंद म्हणे बोलतो सत्य । परी मम गुरुचें प्रतापकृत्य । वर्णन करितां सरस्वतीतें । वाचा अपूर्ण मिरवतसे ॥

### Transliteration

**Gopeechanda mhane bolato satyu | Paree mama guruche prataapa-krityu | Varnana karitaa Sarasvateete | Vaachaa apoorna miravatase ||**

## Ovee 139

जेणें कानिफाचे अर्थालागुनी । सकळ देव आणिले अवनीं । आणिले परी पूर्णपणीं । वृक्षालागी गोविलें ॥

### Transliteration

**Jene Kaaniphaache arthaa-laagunee | Sakala deva aanile avanee | Aanile paree poorna-panee | Vrikshaa-laagee govile ||**

## Ovee 140

सध्यां पहा रे मम प्रतापकरणी । एकादश वर्षे गर्ती अवनीं । अश्वविष्ठेंत राहिला मुनी । प्रताप वर्णू केउता ॥

### Transliteration

Sadhyaa pahaa re mama prataapa-karanee | Ekaadasha varshe gartee avanee | Ashva-vishthenta raahilaa Munee | Prataapa varnu keutaa ||

## Ovee 141

तरी धैर्य धरुनि चार दिन । करा प्रेताचें संगोपन । श्रीजालिंदर येथें आणून । उठवीन भगिनीसी ॥

### Transliteration

Taree dhairya dharuni chaara dinu | Karaa pretaache sango-panu | Shree Jaalindara yethe aanunu | Uthaveena bhagineesee ||

## Ovee 142

परी न ऐकता अविश्वासी । शुभा रचिल्या स्मशानमहीसी । प्रेत ठेवूनि ते चितेसीं । अग्नि लावूं म्हणताती ॥

### Transliteration

Paree na aikataa avishvaasee | Shubhaa rachilyaa smashaana-maheesee | Preta thevuni tey chitesee | Agni laavoo mhanataatee ||

## Ovee 143

तें पाहूनि गोपीचंद । मग आपण चित्तेंत बैसूनि शुद्ध । म्हणे अग्नि लावा प्रसिद्ध । भस्म करा मजलागीं ॥

### Transliteration

Tey pahuni Gopeechandu | Maga aapana chittenta baisuni shuddhu | Mhane agni laavaa prasiddhu | Bhasma karaa majalaagee ||

## Ovee 144

मी भस्म झालिया पोटीं । मग क्रोध न आवरे जालिंदरजेठी । नगर पालथें घालूनि शेवटीं । तुम्हां भस्म करील कीं ॥

### Transliteration

Mee bhasma jhaaliyaa potee | Maga krodha na aavare Jaalindara-jethee | Nagara paalathe ghaaluni shevatee | Tumhaa bhasma kareela kee ||

## Ovee 145

ऐसें बोलतां गोपीचंद वचन । क्रोधें दाटला तिलकचंद पूर्ण । म्हणे गुरुचा प्रताप वर्णून । फुगीरपण मिरवतसे ॥

### Transliteration

Aise bolataa Gopeechanda vachanu | Krodhe daatalaa Tilaka-chanda poornu | Mhane guruchaa prataapa varnunu | Phugeerapana miravatase ||

## Ovee 146

तरी आम्हां सांगतोसी ऐसें । करुनि दावीं चमत्कारास । येरी म्हणे उत्तरासरसें । बोलेन तैसें घडेल ॥

### Transliteration

**Taree aamhaa saangatosee aise | Karuni daavee chamat-kaaraasu | Yeree mhane uttaraasarase | Bolena taise ghadelu ||**

## Ovee 147

येरी म्हणे वाम कर । काढूनि देतों जाई सत्वर । पाहूं दे गुरुचा चमत्कार । प्रेत रक्षूं आम्ही हें ॥

### Transliteration

**Yeree mhane vaama karu | Kaadhuni deto jaaee satvaru | Paahoo de guruchaa chamatkaaru | Preta rakshoo aamhee hey ||**

## Ovee 148

येरी म्हणे फार फार बरवें । चंपावतीचें प्रेत रक्षावें । मी हस्त दावूनि गुरुते भाव । उपजवीन प्रेमाचा ॥

### Transliteration

**Yeree mhane phaara phaara barave | Champaa-vateeche preta rakshaave | Mee hasta daavuni gurute bhaavu | Upajaveena prema-achaa ||**

## Ovee 149

तिलकचंद पुत्रा सांगोनी । वाम कर तियेचा दे काढूनी । गोपीचंद चितासनींहूनी । उठवूनियां बोळविला ॥

### Transliteration

**Tilaka-chanda putraa saangonee | Vaama kara tiyechaa de kaadhuunee | Gopeechanda chitaa-saneenhuunee | Uthavuniyaa bolavilaa ||**

## Ovee 150

नाथ गोपीचंद घेऊनि कर । पुढें चालिला मार्गावर । एक कोस येतां नृपवर । काय केलें इकडे ॥

### Transliteration

**Naatha Gopeechanda gheuni karu | Pudhe chaalilaa maargaa-varu | Eka kosa yetaa nripavaru | Kaaya kele ikade ||**

## Ovee 151

चितेमाजी घालूनि प्रेत । डावलूनि गेले सकळ आप्त । येरीकडे नृपनाथ । हेळापट्टणी चालिला ॥

### Transliteration

**Chitemaajee ghaaluni pretu | Daavaluni gele sakala aaptu | Yereekade nripanaathu | Helaapattanee chaalilaa ||**

## Ovee 152

मार्गी येतां पांच कोस । परी हें कळलें जालिंदरास । मनांत म्हणे नव्हे सुरस । गोपीचंद आल्यानें ॥

### Transliteration

**Maargee yetaa paancha kosu | Paree hey kalale Jaalindaraasu | Manaanta mhane navhe surasu | Gopeechanda aalyaane ||**

## Ovee 153

पिशुन करितील विचक्षणा । नानापरींची होईल वल्गना । आणि बाळ पावेल शोकस्थाना । आप्तजनांपुढती ॥

### Transliteration

**Pishuna kariteela vichakshanaa | Naanaa-pareenchee hoeela valganaa | Aani baala paavela shoka-sthaanaa | Aapta-janaam-pudhatee ||**

## Ovee 154

ऐसा विचार करुनि चित्तीं । आपण चालिला कृपामूर्ती । प्रयाणअस्त्र मंत्रविभूती । चर्चूनियां निजभाळीं ॥

### Transliteration

**Aisaa vichaara karuni chittee | Aapana chaalilaa kripaa-moortee | Prayaa-naastra mantra-vibhootee | Charchuniyaa nija-bhaalee ||**

## Ovee 155

तरी ते प्रयाण अस्त्रमंत्र । एकचि नैषधराजपुत्र । जाणत होता अस्त्र पवित्र । येरां माहीत नव्हतेंचि ॥

### Transliteration

**Taree tey prayaana astramantru | Ekachi Naishadha-raaja-putru | Jaanata hotaa astra pavitru | Yeraa maaheeta navhatenchi ||**

## Ovee 156

तें अस्त्र जालिंदरापासीं । होतें अतिउजळपणासीं । प्रयाण भस्म लावितां भाळासी । वातगती चालिला ॥

### Transliteration

**Tey astra Jaalindaraa-paasee | Hootee ati-ujala-panaasee | Prayaana bhasma laavitaa bhaalaasee | Vaata-gatee chaalilaa ||**

## Ovee 157

मग लोटतां एक निमिष । धांवोनि आला शतकोश । अकस्मात गोपीचंदास । निजदृष्टीनें देखिलें ॥

### Transliteration

**Maga lotataa eka nimishu | Dhaavoni aalaa shata-koshu | Akasmaata Gopeechandaasu | Nijadrishteene dekhile ||**

## Ovee 158

म्हणे वत्सा पुन्हां परतोन । किमर्थ केलें आगमन । चरणावरी भाळ ठेवोन । वृत्तांत सर्व निवेदिला ॥

### Transliteration

Mhane vatsaa punhaa paratonu | Kimartha kele aagamanu | Charanaa-varee bhaala thevonu | Vrittaanta sarva nivedilaa ||

### Ovee 159

मग ऐकोनि वृत्तांता । म्हणे तुझा मनोरथ सिद्ध करीन नृपनाथा । नको करुं कांहीं चिंता । पुनः फीर मागुता ॥

#### Transliteration

**Maga aikoni vrittaantaa | Mhane tujhaa manoratha siddha kareena nripanaathaa | Nako karu kaanhee chintaa | Punah pheera maagutaa ||**

### Ovee 160

अवश्य म्हणोनि दोघे जण । मार्गें करिते झाले गमन । पौलपट्टणामाजी येवोन । राजंगणी संचरले ॥

#### Transliteration

**Avashya mhanoni doghe janu | Maarge karite jhaale gamanu | Paula-pattanaa-maajee yevonu | Raaj-anganee sancharale ||**

### Ovee 161

तंव ते आप्तांसहित मेळा । घालूनि बैसले होते पाळा । विव्हळ चित्तीं नाना बरळा । रुदनशब्दें बोलती ॥

#### Transliteration

**Tava tey aaptaan-sahita melaa | Ghaaluni baisale hote paalaa | Vivhala chittee naanaa baralaa | Rudana-shabde bolatee ||**

### Ovee 162

तों अकस्मात देखिलें द्वयनाथ । महातपी दर्शनयुक्त । देखतांचि तिलकचंद यथार्थ । धांव पुढें घेतसे ॥

#### Transliteration

**Toh akas-maata dekhile dvayanaathu | Mahaatapee darshana-yuktu | Dekhataanchi Tilakachanda yathaarthu | Dhaava pudhe ghetase ||**

### Ovee 163

परम भक्ती करोनियां नमन । त्वरें आणूनि कनकासन । त्यावरी बैसोनि अग्निनंदन । पुढें उभा राहिला ॥

#### Transliteration

**Parama bhaktee karoniyaa namanu | Tvare anuni kanakaasanu | Tyaa-varee baisoni Agni-Nandanu | Pudhe ubhaa raahilaa ||**

### Ovee 164

परी तो नमनादि आदर । जैसा शठाचा श्रृंगार । कीं ढिसाळपणीं ओस नगर । तेवीं विनयभाव तो ॥

#### Transliteration

**Paree toh namanaadi aadaru | Jaisaa shathaachaa shrringaaru | Kee dhisaalapanee osa nagaru | Tevee vinaya-bhaava toh ||**

## Ovee 165

कीं अजाकंठींचे लंबस्तन । कीं गारोडियाचें शूरत्व पूर्ण । कीं वेश्येचें मुखमंडन । तेवीं आदर नृपाचा ॥

### Transliteration

**Kee ajaa-kantheenche lambastanu | Kee gaarodiyaache shooratva poornu | Kee veshyeche mukha-mandanu | Tevee aadara nripaachaa ||**

## Ovee 166

कीं घटामाजी जैसा अर्क । कीं हिंवराची सावली शीतल देख । कीं पिशाचबोलणें न सत्यवाक । तेवीं दावी विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee ghataa-maajee jaisaa Arku | Kee himbarachee saavalee sheetala dekhu | Kee pishaacha-bolane na satyavaaku | Tevee daavee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 167

कीं वृंदावनाचें गोमटें फळ । कीं अर्कवृक्षीं लोंबलें केळ । कीं मैंदाचे गळां माळ । तेवीं विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee vrindaa-vanaache gomate phalu | Kee Arka-vrikshee lombale kelu | Kee maendaache galaa maalu | Tevee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 168

कीं बकाचें दिसे शुद्ध ध्यान । परी अंतरी घोकीत वेंचीन मीन । कीं तस्कराचें मौनसाधन । तेवीं विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee bakaache dise shuddha dhyaanu | Paree antaree ghokeeta vencheena meenu | Kee taskaraache mauna-saadhanu | Tevee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 169

कीं अर्थसाधक वक्ता पूर्ण । परी घातें वेगें घेणार प्राण । तयाचें रसाळ भाषण । दावी विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee artha-saadhaka vaktaa poornu | Paree ghaate vege ghenaara praanu | Tayaache rasaala bhaashanu | Daavee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 170

कीं गोरक्षकाचें ऊर्ध्वगायन । तेंथें कैचे पहावें तानमान । तेवीं त्या राजाचा सन्मान । दावी विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee Goraksha-kaa-che oordh-vagaayanu | Tenthe kaiche pahaave taana-maanu | Tevee tyaa raajaachaa sanmaanu |Daavee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 171

कीं उदधीचें द्रोणांत जळ । कीं कनकतुल्य पिवळी पितळ । कीं विनयाची गोडी बहुरसाळ । तेवीं विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee udadheeche dronaanta jalu | Kee kanakatulya peevalee pitalu | Kee vinayaachee godee bahu-rasaalu | Tevee  vinaya-bhaavaate ||**

## Ovee 172

कीं घरनिघेचें सवाष्णपण । कीं भोंद्याचें देवतार्चन । कीं म्हशाचें गण्या नाम । तेवीं विनयभावातें ॥

### Transliteration

**Kee gharanigheche savaashna-panu | Kee bhondyaache devataar-chanu | Kee mhashaache ganyaa naamu | Tevee vinaya-bhaavaate ||**

## Ovee 173

तन्न्यायें तो नृपती । तिलकचंद उभा भक्तीं । परी भावना सकळ नाथाप्रती । कळूनि आली तयाची ॥

### Transliteration

**Tannyaaye toh nripatee | Tilakachanda ubhaa bhaktee | Paree bhaavanaa sakala Naathaa-pratee | Kaluni aalee tayaachee ||**

## Ovee 174

म्हणे राया चंपावती । ज्ञानकळा सगुण युवती । ऐसी जाया गृहाप्रती । साजेल मातें दिसेना ॥

### Transliteration

**Mhane raayaa Champaavatee | Jnyaana-kalaa saguna yuvatee | Aisee jaayaa grihaa-pratee | Saajela maate disenaa ||**

## Ovee 175

जैसी शिवसाळुंका सुरगणीं । परी ती स्थापावी खडकीं नेऊनी । तेवीं सत्य या सदनीं । चंपावती साजेना ॥

### Transliteration

**Jaisee Shiva-saalunkaa suraganee | Paree tee sthaapaavee khadakee neunee | Tevee satya yaa sadanee | Champaavatee saajenaa ||**

## Ovee 176

गर्दभा काय चंदनलेप । मर्कटा व्यर्थ गीर्वाण भाष उमोप । वायसा जाण कनकपिंजररुप । कदाकाळीं घडेना ॥

### Transliteration

**Gardabhaa kaaya chandanalepu | Markataa vyartha geervaana bhaasha umopu | Vaayasaa jaana kanaka-pinjara-rupu | Kadaa-kaalee ghadenaa ||**

## Ovee 177

तन्यायें चंपावती । तुझें गृहीं असे युवती । जैसी मैंदेगृहा वसती । मनहीन मिरवतसे ॥

### Transliteration

**Tannyaaye Champaavatee | Tujhe grihee ase yuvatee | Jaisee mainde-grihaa vasatee | Manaheena miravatase ||**

## Ovee 178

परी आतां असो कैसें । काय करावें ब्रह्मतंत्रास । मग पाहूनि गोपीचंदवक्रास । हस्त देईं म्हणतसे ॥

### Transliteration

**Paree aataa aso kaise | Kaaya karaave Brahma-tantraasu | Maga pahuni Gopeechanda-vakraasu | Hasta daee mhanatase ||**

## Ovee 179

मग हस्त काढूनि दृष्टी । देता झाला करसंपुटीं । शव जाणूनि पोटीं । उच्चार न करी रायातें ॥

### Transliteration

**Maga hasta kaadhuni drishtee | Detaa jhaalaa kara-samputee | Shava jaanuni potee | Uchchaara na karee raayaate ||**

## Ovee 180

मग कवळूनि भस्मचिमुटी । मंत्रप्रयोग बोले होटीं । सकळ संजीवनीची राहाटी । प्रोक्षीतसे भुजातें ॥

### Transliteration

**Maga kavaluni bhasma-chimutee | Mantra-prayoga bole hotee | Sakala sanjeevanee-chee raahaatee | Proksheetase bhujaate ||**

## Ovee 181

भस्म भुजेसी होतां सिंचन । हांक मारीत तयेकारण । हांकेसरशी त्वरें उठोन । चरणीं माथा ठेवीतसे ॥

### Transliteration

**Bhasma bhujesee hotaa sinchanu | Haanka maareeta taye-kaaranu | Haanke-sarashee tvare uthonu | Charanee maathaa theveetase ||**

## Ovee 182

अहा जाज्ज्वल्य संजीवनी । क्षणांत उठली राजपत्नी । जैसा शुक्रें कच मुखांतूनी । दोन वेळा उठविला ॥

### Transliteration

Ahaa jaajjvalya sanjeevanee | Kshanaanta uthalee raaja-patnee | Jaisaa Shukre kacha mukhaan-toonee | Dona velaa uthavilaa ||

## Ovee 183

तोचि न्याय येथें झाला । सकळांलागीं भाव ठसला । अहा जालिंदरनाथ भला । पूर्ण ब्रह्म म्हणवूनी ॥

### Transliteration

Tochi nyaaya yethe jhaalaa | Sakalaa-laagee bhaava thasalaa | Ahaa Jaalindaranaatha bhalaa | Poorna Brahma mhanavunee ||

## Ovee 184

मग लागवेगें सकळ उठूनी । श्रीनाथाच्या लोटलें चरणीं । म्हणती अपार केली करणी । शुक्र प्रत्यक्ष कलींचा हा ॥

### Transliteration

Maga laagavege sakala uthoonee | Shree-Naathaa-chyaa lotale charanee | Mhanatee apaara kelee karanee | Shukra pratyaksha kaleenchaa haa ||

## Ovee 185

मग समस्त म्हणती फार अपूर्व । कौतुक दावी गोपीचंदराव । धनसंपत्तीतें काय करावें । टाकूनि जावें सर्वस्वीं ॥

### Transliteration

Maga samasta mhanatee phaara apoorvu | Kautuka daavee Gopee-chandaraavu | Dhana-sampatteete kaaya karaave | Taakuni jaave sarvasvee ||

## Ovee 186

मग सर्व जग बोले राया भलें । पश्चातापें पूर्ण तापलें । परी ते स्मशान वैराग्य ठेलें । पुन्हां जैसें तैसेंचि ॥

### Transliteration

Maga sarva jaga bole raayaa bhale | Pashchaataape poorna taapale | Paree tey smashaana vairaagya thele | Punhaa jaise taisenchi ||

## Ovee 187

कीं करी आव्हानिला अति निर्मळ । परी सर्वेचि गंधमोरीं लोळे । उकिरड्यांत उतावेळ | विष्ठाभक्षण आवडतसे ॥

### Transliteration

Kee karee aavhaa-nilaa ati nirmalu | Paree sarvenchi gandhamoree lole | Ukiradyaanta utaavelu |Vishthaa-bhakshana aavadatase |

## Ovee 188

तन्न्यायें सर्व लोक । बोलती पश्चात्तापें दोंदिक । परी न सुटे भोगितां नरक । प्रारब्धयोग तयांचा ॥

### Transliteration

**Tannyaaye sarva loku | Bolatee pash-chaattaape dondiku | Paree na sute bhogitaa naraku | Praarabdha-yoga tayaanchaa ||**

## Ovee 189

असो ऐसी प्रारब्धकरणी । श्रीजालिंदर जाय उठवूनि । मग उठता झाला कनकासनीं । हेलापट्टणीं जावया ॥

### Transliteration

**Aso aisee praarabdha-karanee | Shree Jaalindara jaaya uthavuni | Maga uthataa jhaalaa kanaka-aasanee | Helaa-pattanee jaavayaa ||**

## Ovee 190

मग तो तिलकचंद नृपती । अभिमान दवडूनि झाला गलती । सलीलपणीं पदावरती । मस्तक ठेवी सप्रेम ॥

### Transliteration

**Maga toh Tilakachanda nripatee | Abhimaana davaduni jhaalaa galatee | Saleelapanee padaavaratee | Mastaka thevee sapremu ||**

## Ovee 191

म्हणे महाराजा मी पतित । राजवैभवें झालों उन्मत्त । लघु मानिला गोपीचंदनाथ । तरी क्षमेतें वरीं आतां ॥

### Transliteration

**Mhane Mahaaraajaa mee patitu | Raaja-vaibhave jhaalo unmattu | Laghu maanilaa Gopeechandanaathu | Taree kshamete varee aataa ||**

## Ovee 192

तुम्ही दयाळू कनवाळू संत । मायेहूनि मायावंत । तरी बाळाचे अन्याय यथार्थ । उदरामाजी सांठवा ॥

### Transliteration

**Tumhee dayaaloo kanavaaloo santu | Maayehuni maayaa-vantu | Taree baalaache anyaaya yathaarthu | Udaraa-maajee saanthavaa ||**

## Ovee 193

ऐसें बोलूनि नम्रोत्तर । चरणीं मौळीं वारंवार । ठेवूनि म्हणे आजची रात्र । वस्ती करा या ठायीं ॥

### Transliteration

**Aise boluni namrottaru | Charanee maulee vaaram-vaaru | Thevuni mhane aajachee raatru | Vastee karaa yaa thaayee ||**

## Ovee 194

ऐसें ऐकूनि तयाचें वचन । बोलता झाला अग्निनंदन । चंपावतीचे हस्तेंकरुन । पाकनिष्पत्ती करीं कां ॥

### Transliteration

Aise aikuni tayaache vachanu | Bolataa jhaalaa Agni-nandanu | Champaavateeche hastenkarunu | Paakanishpattee karee kaa ||

## Ovee 195

अवश्य म्हणूनि तिलकचंद । चंपावतीसी सांगे सद्गद । तीतें सांगूनि पाक प्रसिद्ध । करविला नेटका ॥

### Transliteration

Avashya mhanuni Tilakachandu | Champaavateesee saange sadgadu | Teete sanguni paaka prasiddhu | Karavilaa netakaa ||

## Ovee 196

मग चंपावती भ्रतारासहित । बैसविली स्वपंक्तींत । आपुला अनुग्रह देऊनि तीतें । नाथपंथीं मिरवली ॥

### Transliteration

Maga Champaavatee bhrataa-raasahitu | Baisavilee sva-pankteentu | Aapulaa anugraha deuni teete | Naatha-panthee miravalee ||

## Ovee 197

आपुले मुखींचा उच्छिष्ट ग्रास । संजीवनीप्रयोगप्रसादास । देऊनि केलें अमरपणास । मैनावतीपरी सिंचिली ॥

### Transliteration

Aapule mukheenchaa uchchishta graasu | Sanjeevanee-prayoga-prasaadaasu | Deuni kele amara-panaasu | Mainaavatee-paree sinchilee ||

## Ovee 198

ऐसे रीतीं सारुनि भोजन । विडे घेतले त्रयोदशगुण । राया तिलकचंदा भाषण । करिता झाला मुनिराजा ॥

### Transliteration

Aise reetee saaruni bhojanu | Vide ghetale trayoda-shagunu | Raayaa Tilaka-chandaa bhaashanu | Karitaa jhaalaa Muni-raajaa ||

## Ovee 199

म्हणे ऐक बा सर्वज्ञराशी । गोपीचंद जातो पूर्ण तपासी । तरी सांभाळीं याचे राज्यपदासी । बाळ अज्ञान असे याचें ॥

### Transliteration

Mhane aika baa sarva-jnya-raashee | Gopeechanda jaato poorna tapaasee | Taree saambhaalee yaache raajya-padaasee | Baala ajnyaana ase yaache ||

## Ovee 200

तुझा प्रताप महीतें संपूर्ण । शत्रु न येती तेणेंकरुन । मीही तेथें षण्मास राहून । सर्व अर्थ पुरवीन कीं ॥

### Transliteration

Tujhaa prataapa maheete sampoornu | Shatru na yetee tenenkarunu | Meehee yethe shanmaasa rahunu | Sarva artha puraveena kee ||

## Ovee 201

परी राया षण्मासापाठीं । मीही जाईन तीर्थलोटीं । परी मुक्तचंद पडतां संकटी । धांव घाली तूं तेथें ॥

### Transliteration

Paree raayaa shanmaa-sashathee | Meehee jaaeena teertha-lotee | Paree Muktachanda padataa sankatee | Dhaava ghaalee too tethe ||

## Ovee 202

ऐसें बोलता अग्निसुत । अवश्य बोले तो नृपनाथ । यावरी राहूनि एक रात्र । निघते झाले उभयतां ॥

### Transliteration

Aise bolataa Agni-sutu | Avashya bole toh nripanaathu | Yavaree rahuni eka raatru | Nighate jhaale ubhayataa ||

## Ovee 203

करोनि जालिंदरा नमन । गोपीचंद करिता झाला गमन । जालिंदरही मार्ग धरोन । हेलापट्टणीं चालिला ॥

### Transliteration

Karoni Jaalindaraa namanu | Gopeechanda karitaa jhaalaa gamanu | Jaalindarahee maarga dharonu | Helaa-pattanee chaalilaa ||

## Ovee 204

तिलकचंद नृपनाथ । बोळवोनी आला स्वगृहांत । येरीकडे मैनावतीसुत । मुक्काममुक्काम साधीतसे ॥

### Transliteration

Tilakachanda nripanaathu | Bolavonee aalaa sva-grihaantu | Yereekade Mainaavatee-sutu | Mukkaama-mukkaama saadheetase ||

## Ovee 205

ऐसिया राहणी मार्ग क्रमोनी । राव गेला बद्रिकाश्रमीं । बद्रिकेदार भावें नमोनी । तपालागीं बैसला ॥

### Transliteration

Aisiyaa raahanee maarga kramonee | Raava gelaa Badrikaa-ashramee | Badrikedaara bhaave namonee | Tapaalaagee baisalaa ||

## Ovee 206

लोहकंटकी पादांगुष्ट । ठेवोनि तप करी वरिष्ठ । येरीकडे जालिंदर वाटे । येवोनियां पोहोंचला ॥

### Transliteration

Lohakantakee paadaan-gushtu | Thevoni tapa karee varishthu | Yereekade Jaalindara vaate | Yevoniyaa pohonchalaa ||

### Ovee 207

तेथें राहून षण्मास प्रीतीं । मुक्तचंद उपदेशोनि अर्थाअर्थी । कानिफासह शिष्यकटकाप्रती । घेवोनियां चालिला ॥

#### Transliteration

Tethe rahooni shanmaasa preetee | Muktachanda upadeshoni arthaa-arthee | Kaaniphaasaha shishya-katakaapratee | Ghevoniyaa chaalilaa ||

### Ovee 208

नाना तीर्थें करी भ्रमण । द्वादश वर्षे गेली लोटोन । शेवटीं बद्रिकाश्रम पाहोन । गोपीचंद भेटला ॥

#### Transliteration

Naanaa teerthee karee bhramanu | Dvaadasha varshe gelee lotonu | Shevatee Badrikashrama paahonu | Gopeechanda bhetalaa ||

### Ovee 209

मग तैं तपाचा उचित अर्थ । उद्यापना देव समस्त । पाचारोनि स्वर्गस्थ । गौरविले आदरानें ॥

#### Transliteration

Maga tai tapaachaa uchita arthu | Udyaapanaa deva samastu | Paachaaroni svargasthu | Gauravile aadaraane ||

### Ovee 210

महाविष्णु महेश सविता । अश्विनी वरुण अमरनाथा । भेटवोनि समस्त देवतां । सनाथपणीं मिरवला ॥

#### Transliteration

Mahaa-Vishnu Mahesha Savitaa | Ashvinee Varuna amaranaathaa | Bhetavoni samasta devataa | Sanaathapanee miravalaa ||

### Ovee 211

सकळ विद्येचा समारंभभार । अभ्यासविला तो नृपवर । पुन्हां दैवतां आणोनि सत्वर । वधालागीं ओपिलें ॥

#### Transliteration

Sakala vidyechaa samaa-rambhabhaaru | Abhyaasavilaa toh nripavaru | Punhaa daivataa aanoni satvaru | Vadhaalaagee opile ||

### Ovee 212

असो येथोनि गोपीचंदाख्यान । संपलें पुढें करा श्रवण । श्रीगोरक्ष स्त्रीराज्याकारणें । जाईल गुरु आणावया ॥

#### Transliteration

**Aso yethoni Gopeechandaa-khyaanu | Sampale pudhe karaa shravanu | Shree-Goraksha Streeraajyaa-kaarane | Jaaeela guru aanaavayaa ||**

## Ovee 213

तरी आतां अत्यद्भुत । श्रोत्यां सांगेल धुंडीसुत । मालु ऐसें नाम ज्यातें । नरहरिवंशीं मिरवलें ॥

### Transliteration

**Taree aataa atyadbhutu | Shrotyaa saangela Dhundee-sutu | Maalu aise naama jyaate | Narahari-vamshee miravale ||**

## Ovee 214

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । समंत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । अष्टादशाध्याय गोड हा ॥

### Transliteration

**Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Samanta Goraksha-kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Ashtaa-dasha-adhyaaya goda haa ||**

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

***Shri Krishnarpanamastu***

***Shri Dattatreyarpanamastu***

इति श्रीनवनाथभक्तिसार अष्टादशाध्याय संपूर्ण ।

***Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Ashtadasha Sampurnah***